ISSN 2349-638X

REVIEWED INTERNATIONAL JOURNAL

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

MONTHLY PUBLISH JOURNAL

VOL-I ISSUE-III AUG 2014

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512
- (+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
- editor@aiirjournal.com
- aiirjpramod@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

# उदयोन्मुख शिक्षणाचे प्रवाह

प्रा.रमेश कचरू शिंदे

(एम.ए.,एम.एड.,सेट)

अभय शिक्षणशास्त्र महाविद्यालय,धुळे

..........................................................................................................................................................

## प्रस्तावना:—

उदयोन्मुख शिक्षणाची सकल्पना गगनाला गवसणी घालणारी असेल,पूर्वीच्या युगातील वाचन,लेखन आणि अंकज्ञान या शिक्षणाच्या संकल्पनेतून मुक्त होऊन शिक्षणाने घेतलेली झेप एव्हाना दिशांच्या मर्यादेपलिकडे पोहोचलेली आहे.पुढे येणा—या शिक्षणाची संकल्पना भौतिक विश्वातील वस्तुमात्रांच्या परस्परावलंबन,तर्कशक्ती व जबाबदारीची जाण या त्रयींच्याही पुढे अति वेगाने निघाल्याचे दिसेल.क्षणाक्षणाला वाढणारी ज्ञानाची कोठारे कल्पनांच्या सर्व भिंती भेदून गगणाच्या गाभा—यातही मावेनाशी होईल.

अशक्य हा शब्द नेपोलियनच्या शब्द कोशात नव्हकता. तसेच आता शिक्षणाच्या मयादे विषयी म्हणावे लागेल केवळ बुध्दिगम्य विषयांच्या भिंती भेदून शिक्षण आता क्रियाविश्वाशी संबंधित विषय आणि भावनिक स्तरांवर येणारे विषय यांच्याही पलीकडे जाईल.विश्वातील कोणताही संदर्भ आता शिक्षणाच्या संकल्पनेत समाविष्ट झाला नाही असे नाही.म्हणूनच शिक्षणाची दिशा ठरविणे आता मानवी शक्तिच्यापलीकडे गेले आहे. शिक्षणाने व्यक्तिमत्वाचा विकास साधला पाहिजे असे आपण सांगत आलो पण आता व्यक्तिमत्वाची संकल्पनाच पूर्णपणे बदलत आहे. पर्सोना(Personba)हा व्यक्तिमत्व दर्शक शब्द एकेकाळी व्यक्तिमत्वाशी निगडीत होता. आता पर्सोनाच्या व्युत्पतीतून संपर्ण संकल्पना सिध्द होत नाही.त्यामुळे शिक्षण म्हणजे काय हे स्पष्ट करण्यासाठी आधुनिक शब्दकोषांचा आधार घ्यावा लागेल.

## उदयोन्मुख शिक्षणाचे प्रवाह :—

शिक्षण म्हणजे भावी जीवनाची तयारी करून घेण्यासाठीचे आवश्यक साधन होय अशी शिक्षणाविषयीची २०व्या शतकाअखेरची सर्वसामान्य संकल्पना होती.शिक्षण हे ज्ञान मिळविण्याचे साधन असून ज्ञान हे सर्वश्रेष्ठ,असल्याने ज्ञानाश्साठी ज्ञान अशी धारणा पूर्वीच्या काळी रूढ झाली होती.उपयुक्ततेचा सिध्दांत तो पर्यंत सर्वत्र लागू केलागेला नव्हता.उपयुक्ततेच्या सिध्दांतानुसार (Principal of utility) ज्ञान जर उपयोगी पडत नसेल तर ते कशासाठी संपादन करावयाचे असा प्रश्न विचारला जाऊ लागला.ज्ञानासाठी ज्ञान ही कल्पना त्यामुळे अडगळीत पडली.त्यामुळे शिक्षण हे शाळेच्या चार भिंतीत शिक्षकांच्या माध्यमातून संदान करावयाची बाब आहे. अशी शिक्षणाविषयीची धारणा कालबाह्य होऊ लागली.“शाळा मुक्त समाज” (De-Schooling the society) ही संकल्पना पुढे आली.

शिक्षणासाठी केवळ शाळांचीच गरज आहे.ही धारणाही कालबाह्य होऊ लागली.शाळेइतकीच किंबहूना त्याहूनही अधिक प्रगत आणि अधिक विश्वासाई आधुनिक साधनेपुढे आली.दूरदर्शन, आकाशवाणी,वर्तमानपत्रे आणि आता तर मोबाईल युगातील इंटरनेट आणि सायबर कॅफे ह्या साधनांचा अधिक उपयोग होऊ लागला.संगणकाच्या प्रभावी प्रसारामुळे ज्ञानही आता कोणा एकाची किंवा कोण्या एका समाजाची मालकी उरली नाही.त्यामुळे ब्रिटीश युगातील “Education will Filter downwards” ‘शिक्षण हे पाझरत जाईल’ अशी समजुत आपोआपच ठोकरली गेली.त्यामुळे पुढील काही भविष्याकालीन प्रवाह यांचा विचार करणे आवश्यक आहे.

## १.मुक्तशाळा :—

मुक्तशिक्षण या संकल्पनेत मुक्तशाळा,दुरशिक्षण,निरंतर शिक्षण,पत्राव्दारे शिक्षण,मुक्तविद्यापीठ इ. विभागांचा समावेश होतो.औपचारीक शिक्षणाला पर्याय म्हणून मुक्तशाळा स्थापन करण्यास विशेष प्राधाण्य देण्यात

आले.इ.स.१९७५ते १९७८ या कालावधीत भारतातील व परदेशातील अनेक शिक्षणतज्ज्ञांच्या अनेक बैठका होऊन सेंट्रल बोर्ड ऑफ सेंकडरी एज्युकेशन (CBSC) या संस्थेने मुक्तशाळेचा एक आराखडा तयार केला.जुलै १९७९ मध्ये भारत सरकारच्या शिक्षणखात्याने त्यास मंजुरी दिली.

ज्या व्यक्ती माध्यमिक शाळेपासून वंचीत आहेत,विविध व्यावसाय करीत आहेत,प्राथमिक स्तरावर ज्यांनी औपचारीक पध्दतीने शिक्षण प्राप्त केले आहे व ज्यांना माध्यमिक व उच्चमाध्यामिक शिक्षण घेणे आवश्यक वाटते अशांची व्यवस्था मुक्तशाळेने केली आहे.प्रत्येक जिल्हयात एक साधन केंद्र व त्यासह मुक्तशाळा निर्माण करुन त्यानिवडक माध्यामिक,शिक्षण प्रशिक्षण संस्था यांना जोडणे असे या शाळेचे स्वरुप आहे.या शाळांत विद्यार्थ्यांना आपल्या आवडीनुसार व अध्ययन क्षमतेनुसार अभ्यास करता येतो.या वैशिष्यांमुळे मुक्तशाळांची गरज आहे.

### वैशिष्टये:—

१.पूर्णवेळ शिक्षकाकडून अध्यापन केले जाते.

२.प्रक्रियेचे स्थान व वेळ निश्चित असते.

### २.नि:शाळा —नि:शालाकरण:—

इ.स.१९६० मध्ये मेक्सिको येथे इव्हान इलिच व रिमूर यांनी center for intercultural documentation ही संस्था स्थापन केली.पारंपारीक शाळा पध्दतीचे दोष दाखवणारी Deschooling Society हे पुस्तक लिहले.रिमूर यांनी School is dead हे पुस्तक लिहले व उदयाला ही अगदी नविन कल्पना साधारणपणे १९६०—१९७० यादरम्यानची.अमेरीकेतील (मेक्सिको)इव्हान इलीच हा या कल्पनेचा पुरस्कर्ता होय.अमेरिकेत वैज्ञानिक शोधांचा जीवन सुखकर व आरामदायी बनविनाऱ्या वस्तुंचा इतक्या विपूल प्रमाणात होतो की,त्यामुळे जीवनाला कृत्रिमपणा येतो याचा परिणाम ााळेच्या कामकाजावरही होणे अपरीहार्य आहे. ााळांमधुन एक अतिशय कृत्रिम व साचेबंद अध्यापन करणारी एक समस्या असे तिचे स्वरूप बनणे क्रमप्राप्त होते.यामध्ये व्यक्तिच्या सुप्त गुणांचा अविष्कार होण्याची ाक्यता कमी होते.शिक्षकांना सुधा या साधेपणामुळे स्वत:चे वेगळे विचार,मत स्वातंत्र्य उरत नाही.बाहेरील जगाची दखल राहत नाही आणि ााळा साचेबंद विचार शिकवणाऱ्या संस्था बनतात.समाज जीवनाशी संपर्क तुटलेल्या ााळा व्यािक्तला समाजामध्ये कसे वागावे हे कसे शिकवणार? खरे म्हणजे सामाजिकबाबींचा संसाधन म्हणून उपयोग केला पाहिजे.यासाठी पुढिल चार गोष्टीवर भर दिला आहे.

**अ) संदर्भ सेवा (Reference Services)—**

समाजामध्ये ज्या ज्या वातावरणात जीवनाला उपयुक्त अध्ययनबाबी आहेत त्या या वातावरणात विद्यार्थ्यांना सहजरितीने उपलब्द करुन द्या.

**ब)कौशल्याची देवाण—घेवाण(Skill Exchange)—**

समाजामध्ये वेगवेगळया क्षेत्राात अत्यंत तज्ञ व कुशल कामगार आहेत.त्यांच्या संपर्कातेन त्यांच्या कौशल्याचा विद्यार्थ्यांना लाभ घेऊ द्यावा.

**क)समगुणी गट (Peer Matching)-**

ज्याची आवड,अभिरूची सारखी आहे त्यांना एकत्र येण्यासाठी फे द्या त्यांचे त्यानाच गट तयार करू द्या.त्यांचे त्यानाच गट तयार करू द्या.गट करण्याचे व कोणते ज्ञान मिळवावयाचे या दोन्ही गोष्टीचे त्यांना स्वा. द्या.

**ड)शिक्षण तज्ञाना संदर्भ सेवा(Reference Services for Educationalogist)–**

शिक्षकाना आपला विषय शिकविताना अनेक विषयांचे महत्वपूर्ण संदर्भ लागतात समाजामध्ये हे संदर्भ पुरवू शकणारी तज्ञ मंडळी आहेत.शिक्षकांना त्यांचा लाभ घेऊ द्या.

इलिच म्हणतो जगापासून शिकण्यापेक्षा जगाविषयी शिकणे हे निश्चितपणे अणिक महत्वाचे. शालेय कामकाजात लवचिकता आणली पाहीजे.अभ्यासक्रम,अध्यापन पध्दती,शाळेची वेळ या वर असलेले कडक निर्बंध बंद करा.

Deschooling is also known as reschooling or free schooling-प्रत्येकाला मनोमन पटणारा व अतिशय धक्कादायक शिक्षण विचार इव्हान इलिचने जगापुढे ठेवला.अमेरीकेसारख्या अतिप्रगत देशाच्या दृष्टीने जरी ती २०व्या शतकाच्या सातव्या दशकातील स्थिती असली तरी आपल्या दृष्टीने आजही हा विचार महत्वपूर्ण आहे.

## ३)दुरस्थ शिक्षण ( Distance Education):-

भविषकालीन विचार प्रवाहामध्ये दूरस्थ शिक्षण हाएक महत्वपूर्ण विचार आहे. इंटरनॅशनल डिक्शनरी ऑफ एज्युकेशन प्रमाणे दुरस्थ शिक्षण म्हणजे असे शिक्षण की ज्यात शिक्षक आणि विद्यार्थी हे एकमेकाच्या प्रत्यक्ष संपर्कात नसून पत्राचार,आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या माध्यमातून संवाद साधतात.

शिक्षा परिभाषा कोषा प्रमाणे पत्राचार पाठयक्रम म्हणजे पाठयक्रमातील निरनिराळया घटकावर आधारीत पाठ तयार करून विद्यार्थ्याना नियमितपणे पत्राव्दारे पोहचविणे,विद्यार्थी सुध्दा आपल्या समस्या व प्रश्नांची उत्तरे पत्राव्दारेच पाठवितात.ज्यांचे मूल्यांकन सुध्दा पत्राव्दारेच संप्रेषित केले जाते.आधुनमधून संपर्क सत्राचे देखिल आयोजन केले जाते.

दूरस्थ शिक्षणासाठी पुढील बाबी आवश्यक असतात.मुख्य केंद्र व संपक्र केंद्र यांचे उत्तम संघटन तसेच या दोघांचे अध्ययन केंद्राशी उत्तम संघटन,वाचन व पठण साहित्याची निर्मिती–सर्व केंद्राचा एकमेकाशी उत्तम संपर्क व सर्वसामान्य जनतेमध्ये दूरस्थ शिक्षणच्यवस्थेचा उत्तम प्रचार व प्रसार करणे गरजेचे असते.

## ४)शाळा समुह योजना:–

जगतिकीकरणामुळेगुणवत्तेला असणारे महत्वअधिकच वाढले.प्राथमिक,माध्यमिक,महाविद्यालयीन विद्यापीठीय शिक्षणाची गुणवता आहे त्यापेक्षा सतत वाश्ढत राहिली पाहिजे.गुणवत्ता वाढीच्या प्रक्रियेमध्ये शिक्षक हा अत्यंत महत्वपूर्ण घटक आहे.त्याला आपल्या अध्यापनाचा दर्जा वाढविण्यासाठी, अध्यापन समृध्द होण्यासाठी,आपल्या विषयांतर्गत येणा–या समस्या सोडविण्यासाठी,संदर्भासाठी मदतीची आवश्यकता असते ही अडचण दुर करण्यासाठी शिक्षण तज्ञानी ाळा समुह योजनेची संकल्पणा समोर आणली ती पुढील प्रमाणे–एक दर्जेदार,उत्तम इमारत,शौक्षणिक साणनांनी परिपूर्ण समृध्द ग्रंथालय,उत्तम शिक्षक असलेली चांगली माध्यमिक शाळा निवडायची,त्या शाळेपासून ८ ते १६ कि.मी.परिघातील सर्व प्राथमिक शाळा या दर्जेदार माध्यमिक शाळेला जोडायच्या व एक शाळा समुह तयार करायचा,ही दर्जेदार माध्यमिक शाळा आपल्या समुहातील प्राथमिक शाळाना पुढील प्रमाणे शैक्षणिक मार्गदार्शन करू शकते.माध्यमिक शाळेतील शिक्षण प्राथमिक शाळेतील शिक्षकांना प्रभावी अध्यापन पध्दती शिकऊ शकतील, विषयज्ञान वाढीसाठी मार्गदर्शन करू शकतील.नवीन अध्यापन तंत्राचा परिचय करून देऊ शकतील,अध्यापनाची प्रतिमाने हा भाग आपण उदाहणासाठी घेऊ शकु. शैक्षणिक साहित्याची देवाण घेवाण होऊ शकेल.संपर्क वाढेल व त्यामुळे एकी वाश्ढेल,प्रयोग शाळेचा प्राथमिक शाळांना उपयोग होईल.

शाळा समुह योजना ही एकूण त्या विशिष्ट परिसरातील प्राथमिक शाळामधील शिक्षणप्रक्रिया समृध्द करण्यास व प्रामुख्याने येथील शिक्षकांची गुणवता वाढण्यास निश्चित मदत करू शकेल. हीच योजना विद्यापीठ– महाविद्यालय व माध्यमिकशाळा यांची एक सुंदर साखळी गुंफूनही करता येण्यासारखी आहे असे झाले तर खरोखरच ही विद्यामंदिरे अतिशय उत्तम व प्रभावि ज्ञानमंदिरे झाल्याशिवाय राहणार नाहीत.

अशाप्रकारे उदयोन्मुख शिक्षण हे औपचारीक शिक्षणाकडून अनौपचारिक शिक्षणाकडे घेऊन जाईल.पण शिक्षण प्रक्रियेतील शिल्लक विद्यार्थी अभ्यासक्रम अध्यापन पध्दती,परीक्षा पध्दती आणि मुल्यमापन

याच्या मध्ये अमुलाग आधुनिक बदल हाईल त्या अनुशंगाने भविषकालीन शिक्षण अधिक जलद,प्रगत व विद्यार्थ्यायाच्या सोईचे तर शिक्षकाची जबाबदारी वाढविणारेही असेल. त्यामध्ये वरील शिक्षणातील नव प्रवाह महत्वाची भूमिका बजावतील.त्यात शासनाची भुमिका महत्वाची ठरेल.एकुणच भविषकालीन शिक्षण हे शाश्वत विकासाकडे घेऊन जाणारे असेल.

## संदर्भ ग्रंथः—


- डॉ.अरविंद दुनाखे ,भायतकीय शिक्षण पध्दती व माध्यमिक शिक्षक,नुतन प्रकाशन,पुणे सुधारित दुसरी आवृती ,नोव्हे.१९९८.
- डॉ.म.बा.कुंडले,शैक्षणिक तत्वज्ञान आणि शैक्षणिक तत्वज्ञान,महाराष्ट्र विद्यापिठ ग्रंथ निर्मिती मंडळ १९७५
- लिला पाटील, विश्वंभर कुलकर्णी ,आजचे शिक्षण ! आजच्या समस्या,श्री विद्याप्रकशन ,पुणे—१९९०
- डॉ. शारदा सेवतेकर—बडवे ,शैक्षणिक तंत्र विज्ञान आणि व्यवस्थापन,विद्या प्रकाशन नोगपुर—२००५
- Dr.S.S.Mathur:A sociological Approach to Indian education,Seventh edition 1985,Vinod Pustak mandir,Agra-2
- S.D.Khanna,V.K.Saxena,T.P.Lamba,V.Murthy:Education in the emerging Indian society,(made easy),third revised edition,1994;doaba house booksellers and publishers,Delhi.